# मुले म्हणजे म्हातार काठी

प्रकाशित:


**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ



© **पुनरारंभ**



**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# मुले म्हणजे म्हातार काठी

बालपणी माता-पिता आपल्या मुलांचे लाड, कोर्डकौतुक करतात. मोठया लाडाने त्याला राजा, सोन्या, छकुल्या अशा अनेक गोंडस पेमळ नावांनी संबोधतात. त्याचे सर्व बाल हट्ट पुरवितात. केवळ कर्तव्यापोटी. त्यामागे एकच भावना असते. तो मोठा व्हावा, उच्च शिक्षण घ्यावे, स्वतःचे, माता पित्याचे व घराण्याचे नाव कमवावे इ.इ. शिक्षंण पूर्ण करून नोकरी अथवा व्यवसायास लागल्यावर त्यांचा विवाह करून देणे, संसार उभा करणे इतपत माता पित्याची कर्तव्ये.

मुलं जसजशी मोठी होतात तसतसे आई वडिलांचे वयपण वार्धक्याकडे झुकत असते. मनात सहजच भावना जागृत होते. ज्यांचे आपण लाड केले, कोर्डकौतुक केले, बाल हट्ट पुरविले, सुसंस्कार केलेत, प्रसंगी कष्ट उपसले, याची परिणीती म्हणून उतार वयात आधार द्यावा. ही माफक अपेक्षा.

म्हणतात, बापाचा जोडा मुलाच्या पायात बसावयास लागल्यावर बापाने मुलाशी व आईने मुलीशी मित्रत्वाचे नात्याने वागावे. आमच्या वेळी असे नव्हते, हे मला जमत नाही असा नकारात्मक दृष्टिकोन बदलायला हवा. दोन पिढयातील अंतरामुळे केव्हा तरी मतभेद होण्याचा संभव असतो. अशावेळेस उभयतांनी जुळते घेउन एकरूप होण्याचा प्रयत्न करावा व अंतर कमि करावे. या अनुषंगाने उदाहरणादाखल तरूणांना सांगावेसे वाटते की, पुर्वीच्या काळी संध्याकाळी सातच्या आत घरात येण्याची रीत होती. पण आजकालच्या बदलत्या जिवन शैलीमुळे ते शक्य होत नाही. अशावेळी किमान पक्षी जास्त रात्र न करता घरी वृध्द माता पिता आहेत याची जाणीव ठेउन शक्य तितक्या लवकर घरी परतण्याचे करावे. आजकालचा जमाना म्हणजे शर्यतीचा जमाना समजला जातो. जो पुढे पळेल तोच जिंकतो. हे काही अंशी खरे आहे. त्यामुळे शनिवार, रविवार व सुटीचे दिवस आमचे हक्काचे दिवस आहेत. या दिवशी आम्ही एकटे फिरावयास जाउ, मित्र मैत्रिणींना भेटू हा हेका सोडावा. आज काल बहुतेकांकडे स्वतःचे चारचाकी वाहन असतेच. जरी नसले तरी एकाद वेळी भाडयाने घेउन शनिवारी रविवारी अगर सुटीच्या दिवशी घरातील सर्व सदस्यांसमवेत एकत्रित पणे कोठेतरी निसर्ग सान्निध्यात अथवा धार्मिक स्थळी छानशी ट्रीप करून फिरावयास गेल्यास आपसात सुसंवाद साधला जाउन मतभेद दूर होउ शकतात. नातवंडे असल्यास त्यांना पण आजी आजोबांचे प्रेम मिळेल व त्यांचा सहवास लाभेल.

मुले मोठी झाली म्हणजे त्यांचे जग वेगळे होते. वेगळया जगात वावरतांना कधीतरी चुकुन झालेल्या छोटया मोठया कुटुंब कलहा मुळे अथवा आपसी मतभेदामुळे विभक्त होणे अपरिहार्य ठरते. विभक्तिचा

निर्णय घेण्यापुर्वी तरूण तरूणींना सागावेसे वाटते की, वृध्द माता पित्यांची अपेक्षा काय आहे, त्यांना काय हवे काय नको, ते असे का म्हणतात याचा सारासार विचार करावा. त्यांना समजून घेण्याचा, समजाविण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्या भावना लक्षात घ्या, पित्याच्या डोळयात आयुष्यात फक्त दोनवेळा पाणी येते. एकदा मुलगी सासरी जातांना व दुसरे मुलगा विभक्त होतांना. अशावेळी वृध्द माता पित्यांचे धैर्य खचते व त्यांच्या पायाखालची वाळू सरकते. ज्यांना आपण म्हातारपणाची काठी समजतो तीच हरविल्याने त्यांनी पाहिलेले स्वप्न भंग होते, अपेक्षांची राख रांगोळी होते. 'सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे' याची प्रचिती येते.

एकटे राहर्णाया वृध्दांनी हे लक्षात घ्यावे की, प्रेम हे जगण्याचे प्रभावी साधन आहे. प्रेमाने जग जिंकता येते. शेजारी पाजारी आप्त स्वकियांना आपल्या नातेवाईकांच्या जागी ठेउन, जसे प्रेम द्याल तसे प्रेम तुम्हाला त्यांच्या कडून मिळेल. अडी अडचणीच्या वेळी प्रथम तेच आपल्या मदतीला धावून येतील. अशावेळी आपली मुले ज्यांना आपण जन्म दिला, लहानाचे मोठे केले, ज्यांच्याशी आपले रक्ताचे व भावनीक नाते जुडले आहे त्यांची आठवण येणे स्वाभाविकच आहे. त्यांचे विना सर्व काही उणे असल्याचे जाणवेल. केवळ नोकरी व्यवसाया व अन्य कारणांनी दूर जावे लागल्यामुळे ते उशीरा का आपण दिलेल्या प्रेमामुळे, केलेल्या सुस्कारांमुळे आपल्याकडे जरूर येणारच यात तीळमात्र शंका नाही.

अशा छोटया मोठया गोष्टींचा सर्वांनी विचार केला व त्याचा अवलंब केला तर खचितच सर्वांचे आयुष्य व वृध्दापकाळपण सुखाने घालविता येईल.